# पणन विभागाचा १०० दिवसांचा नियोजन आराखडा अंमलबजावणीचा आढावा

| अ. क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण / अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय / फोटो/ इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्यस्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | उत्पन्नानुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांची वर्गवारी | कार्यवाही पूर्ण | शासन निर्णय दि.०१.०४.२०२५ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. | - |
| २ | राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) योजना | कार्यवाही पूर्ण | राज्य स्तरीय समितीने १८ बाजार समित्यांना ई-नाम योजनेमध्ये अंतर्भाव करण्यास मंजूरी दिल्यानुसार दि.२५ मार्च, २०२५ च्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. | - |
| ३ | मुख्यमंत्री बाजार समिती योजना | कार्यवाही पूर्ण | शासन निर्णय दि. १७.०४.२०२५ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. | - |
| ४ | मॅग्नेट प्रकल्प- (Maharashtra Agribusiness Network- MAGNET २.०) | कार्यवाही सूरु | - | प्रकल्प संचालक, मॅग्नेट प्रकल्प यांनी सादर केलेल्या Preliminary Project Report (PPR) बाबत नियोजन व वित्त विभागाची सहमती घेऊन केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत नियोजन विभागास प्रस्ताव सादर<br>(दि. ३१ मे पर्यंत कार्यवाही पूर्ण होईल.) |
| ५ | किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी | कार्यवाही सूरु | - | Price Support Scheme अंतर्गत खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा तयार करणे व खरेदी केंद्रासाठी किमान निकष (Minimum Bench Mark) या संदर्भात व्यवस्थापकीय संचालक, मार्केटींग फेडरेशन यांच्या अध्यक्षतेखाली समितीने शासनास अहवाल सादर केला असून कार्यवाही सूरु आहे.<br>(दि. ३१ मे पर्यंत कार्यवाही पूर्ण होईल.) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | महामुंबई आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारणे | कार्यवाही सूरु | - | • Alsmeer, Amsterdam व Rungis, Paris या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बाजारपेठ धर्तीवर नवीन महामुंबई मार्केट उभारणेकरीता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळातर्फे Detail Techno Economic Feasibility Report तयार करण्यासाठी REP प्रसिध्द करण्यात आली असून त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे.<br>• जमीन उपलब्धतेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई यांचेकडे पाठपुरावा सुरु आहे.<br>• नवी मुंबई येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या धर्तीवर पुनर्विकास करण्यासंदर्भात Feasibility report तयार करण्यात येत आहे.<br>• **१०० दिवसात पूर्ण होऊ शकणार नाही.**<br>• **या प्रकल्पास दीर्घ कालावधी लागणार आहे.** |
| ७ | समृध्दी महामार्गालगत ॲग्रो लॉजिस्टीक हब विकसित करणे. | कार्यवाही सूरु | - | • या संदर्भात नागपूर, छत्रपती संभाजी नगर, तळेगाव दाभाडे, भिवंडी, सिन्नर (नाशिक) व वाढवण (पालघर) येथे ॲग्रो लॉजिस्टिक हब उभारण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे तसेच कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांनी Preliminary Project Report (PPR) सादर केला आहे.<br>• समृध्दी महामार्गालगत असलेले नोडस वखार महामंडळास हस्तांतरीत करणेबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास यापूर्वी वखार महामंडळाद्वारे विनंती करण्यात आली आहे.<br>• **१०० दिवसात पूर्ण होऊ शकणार नाही.**<br>• **या प्रकल्पास दीर्घ कालावधी लागणार आहे.** |
| | | कार्यवाही सूरु | - | जांबरगाव येथील लॉजिस्टिक हब कार्यान्वीत करण्यासाठी MSEDCL कडून विद्यूत वाहिनी टाकण्याची कार्यवाही सूरु आहे.<br>(दि. ३१ मे पर्यंत कार्यवाही पूर्ण होईल.) |

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे सुधारित
वर्गीकरण करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कृबास २०२५/प्र.क्र.६९/११-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि. ०१ एप्रिल, २०२५

**प्रस्तावना:-**

राज्यात एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या असून सदर बाजार समित्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. शासन पत्र दि.०३.०४.२००१ अन्वये उत्पन्नानुसार बाजार समित्यांचे अ,ब,क,ड असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यामध्ये "अ" वर्गामध्ये रु.१.०० कोटीपेक्षा जास्त उत्पन्न, "ब" वर्गामध्ये रु.५०.०० लाख ते १.०० कोटी उत्पन्न, "क" वर्गामध्ये रु.२५.०० लाख ते रु.५०.०० लाख उत्पन्न , "ड" वर्गामध्ये रु.२५.०० लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा समावेश आहे. सन २०२३-२४ अखेर राज्यातील "अ" वर्गामध्ये १९४ बाजार समिती, "ब" वर्गामध्ये ५४ बाजार समिती, "क" वर्गामध्ये २७ बाजार समिती व "ड" वर्गामध्ये ३० बाजार समित्यांचा समावेश आहे. बाजार समित्यांचे आस्थापना खर्च मर्यादेबाबत शासनाने दि.२८.०८.२०१४ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. त्यानुसार "अ" वर्ग बाजार समिती आस्थापना खर्च मर्यादा ४५% आहे. "ब" वर्ग बाजार समिती आस्थापना खर्च मर्यादा ५०% आहे. "क" व "ड" वर्गीय बाजार समिती आस्थापना खर्चामध्ये १०% वाढ करण्याबाबत पणन मंडळ यांनी बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती तपासून निर्णय घ्यावा असे नमूद केले आहे.

पणन विभागामार्फत पुढील १०० दिवसांत करावयाच्या कृती कार्यक्रमात "राज्यातील सध्याच्या १ कोटीपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या बाजार समित्यांचे रु. १ ते २.५ कोटी, रु. २.५ कोटी ते ५ कोटी, रु. ५ कोटी ते १० कोटी, रु. १० कोटी ते २५ कोटी व रु. २५ कोटी पेक्षा जास्त असे उपवर्गीकरण" हा मुद्दा समाविष्ट करण्यात आला आहे. त्यानुसार पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.२७.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये "अ" वर्गीय कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे उपवर्गीकरणासह "ब", "क" व "ड" बाजार समित्यांचे वर्गीकरणाबाबत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्या अनुषंगाने "अ" वर्गीय कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे उपवर्गीकरण तसेच "ब", "क" व "ड" बाजार समित्यांचे वर्गीकरणाबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केल्यानुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे एकूण उत्पन्न, एकूण खर्च, वाढावा व तूट या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित वर्गीकरण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | वर्गवारी | उत्पन्न मर्यादा | बाजार समित्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अ*****(पंच तारांकित) | रुपये २५ कोटी पेक्षा जास्त | ०५ |
| २ | अ**** | रुपये १० कोटी ते रुपये २५ कोटी | १५ |
| ३ | अ*** | ५ कोटी ते रुपये १० कोटी | २३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | अ** | रुपये २.५ कोटी ते रुपये ५ कोटी | ६० |
| ५ | अ* | रुपये १ कोटी ते २.५ कोटी | ९१ |
| २ | ब | रुपये ५० लाख ते रुपये १ कोटी | ५४ |
| ३ | क | रुपये २५ लाख ते ५० लाख | २७ |
| ४ | ड | रुपये २५ लाख पेक्षा कमी | ३० |
| | | एकूण | ३०५ |

२. कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या उपरोक्त वर्गीकरणानुसार संबंधित वर्गीकरण गटात अंतर्भूत असलेल्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांची यादी शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात जोडण्यात आली आहे.

३. बाजार समित्यांचे आस्थापना खर्च मर्यादेबाबत "अ" वर्ग बाजार समिती आस्थापना खर्च मर्यादा ४५% आहे, "ब" वर्ग बाजार समिती आस्थापना खर्च मर्यादा ५०% आहे, तसेच "क" व "ड" वर्गीय बाजार समिती आस्थापना खर्चामध्ये १०% वाढ करण्याबाबत पणन मंडळ यांनी बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती तपासून निर्णय घेण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४०११५५६३१६१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH DNYANDEO DESHMUKH

Digitally signed by SANTOSH DNYANDEO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=9652b1a97746d93924d97e059e2acb2aa9b6ef9c2644ab23e6c801f3e656b5ad, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=17757CD30EDSF82FA2A50F777CBE634900B7D3EBCB60660E708648C95D8488B7, cn=SANTOSH DNYANDEO DESHMUKH
Date: 2025.04.01 15:57:18 +05'30'

**( संतोष ज्ञा. देशमुख )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई-३२
२. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई-३२
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव, मंत्रालय मुंबई
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
६. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व जिल्हे)
७. अवर सचिव/कक्ष अधिकारी, कार्यासन २१-स, २४-स, १०-स, ११-स, १-स सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. निवडनस्ती ११-स

## शासन निर्णय क्रमांक:कृबास-२०२५/प्र.क्र.६९/११-स, दि.३१.०३.२०२५ सोबतचे विवरणपत्र

### विवरणपत्र

रु.२५.०० कोटीपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- अ***** वर्ग (पंच-तारांकित) (एकूण ०५)

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|
| १ | मुंबई | ठाणे |
| २ | पुणे | पुणे |
| ३ | नागपूर | नागपूर |
| ४ | सोलापूर | सोलापूर |
| ५ | लातूर | लातूर |

रु.१० ते रु.२५ कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- अ**** वर्ग (चार- तारांकित) (एकूण १५)

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | हिंगणघाट | वर्धा | ९ | सांगली | सांगली |
| २ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | १० | जालना | जालना |
| ३ | नाशिक | नाशिक | ११ | जुन्नर | पुणे |
| ४ | कोल्हापूर | कोल्हापूर | १२ | कल्याण | ठाणे |
| ५ | अमरावती | अमरावती | १३ | अकोला | अकोला |
| ६ | खामगाव | बुलढाणा | १४ | भिवंडी | ठाणे |
| ७ | लासलगाव | नाशिक | १५ | बार्शी | सोलापूर |
| ८ | अहिल्यानगर | अहिल्यानगर | | | |

रु.५ ते रु.१० कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- अ*** वर्ग (तीन-तारांकित) (एकूण २३)

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | लाखनी | भंडारा | १३ | मंचर | पुणे |
| २ | खेड | पुणे | १४ | नेवासा | अहिल्यानगर |
| ३ | सावनेर | नागपूर | १५ | वरोरा | चंद्रपूर |
| ४ | वाशिम | वाशिम | १६ | येवला | नाशिक |
| ५ | मालेगाव | नाशिक | १७ | आकोट | अकोला |
| ६ | जळगाव | जळगाव | १८ | नंदूरबार | नंदूरबार |
| ७ | नामपूर | नाशिक | १९ | राहाता | अहिल्यानगर |
| ८ | राहूरी | अहिल्यानगर | २० | मनमाड | नाशिक |
| ९ | कारंजा | वाशिम | २१ | तुमसर | भंडारा |
| १० | छ. संभाजीनगर | छ.संभाजीनगर | २२ | मंगरुळपीर | वाशिम |
| ११ | उदगीर | लातूर | २३ | पनवेल | रायगड |
| १२ | बारामती | पुणे | | | |

रु.२.५ ते ५ कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- अ** वर्ग(दोन तारांकित) (एकूण ६०)

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मलकापूर | बुलढाणा | ३१ | घाटंजी | यवतमाळ |
| २ | सटाणा | नाशिक | ३२ | चार्मोशी | गडचिरोली |
| ३ | उमराणे | नाशिक | ३३ | तासगाव | सांगली |
| ४ | राळेगाव | यवतमाळ | ३४ | अकलूज | सोलापूर |
| ५ | मानवत | परभणी | ३५ | इंदापूर | पुणे |
| ६ | गोंदिया | गोंदिया | ३६ | कोपरगाव | अहिल्यानगर |
| ७ | दर्यापूर | अमरावती | ३७ | सिल्लोड | छ. संभाजीनगर |
| ८ | धुळे | धुळे | ३८ | कळवण | नाशिक |
| ९ | कराड | सातारा | ३९ | आर्वी | वर्धा |
| १० | माजलगाव | बीड | ४० | वडगाव पेठ | कोल्हापूर |
| ११ | पंढरपूर | सोलापूर | ४१ | रावेर | जळगाव |
| १२ | चांदवड | नाशिक | ४२ | अमळनेर | जळगाव |
| १३ | पुलगाव | वर्धा | ४३ | परभणी | परभणी |
| १४ | आरमोरी | गडचिरोली | ४४ | शेवगाव | अहिल्यानगर |
| १५ | औसा | लातूर | ४५ | पारनेर | अहिल्यानगर |
| १६ | अचलपूर | अमरावती | ४६ | उमरेड | नागपूर |
| १७ | श्रीरामपूर | अहिल्यानगर | ४७ | चोपडा | जळगाव |
| १८ | चंद्रपूर | चंद्रपूर | ४८ | मुर्तीजापूर | अकोला |
| १९ | वैजापूर | छ.संभाजीनगर | ४९ | दोंडाईचा | धुळे |
| २० | लासूर स्टेशन | छ.संभाजीनगर | ५० | बीड | बीड |
| २१ | संगमनेर | अहिल्यानगर | ५१ | वर्धा | वर्धा |
| २२ | रिसोड | वाशिम | ५२ | शिरपूर | धुळे |
| २३ | धामणगाव रेल्वे | अमरावती | ५३ | शिरुर | पुणे |
| २४ | सिन्नर | नाशिक | ५४ | चाळीसगाव | जळगाव |
| २५ | नांदेड | नांदेड | ५५ | सेलू | परभणी |
| २६ | नांदगाव | नाशिक | ५६ | धर्माबाद | नांदेड |
| २७ | पाचोरा | जळगाव | ५७ | जामखेड | अहिल्यानगर |
| २८ | परळी वैद्यनाथ | बीड | ५८ | आमगाव | गोंदिया |
| २९ | सिंदी | वर्धा | ५९ | देवळा | नाशिक |
| ३० | दिंडोरी | नाशिक | ६० | हिंगोली | हिंगोली |

रु.१ ते २.५ कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- अ* वर्ग(एक-तारांकित) (एकूण ९१)

| अ. क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ. क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ. क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चांदूर बाजार | अमरावती | ३१ | जयसिंगपूर | कोल्हापूर | ६१ | शेगाव | बुलढाणा |
| २ | नांदूरा | बुलढाणा | ३२ | किल्ले धारुर | बीड | ६२ | कन्नड | छ.संभाजीनगर |
| ३ | घोटी | नाशिक | ३३ | नागभीड | चंद्रपूर | ६३ | वाई | सातारा |
| ४ | कळमेश्वर | नागपूर | ३४ | लोणार | बुलढाणा | ६४ | मानोरा | वाशिम |
| ५ | दौंड | पुणे | ३५ | वरुड | अमरावती | ६५ | गोंडपिंपरी | चंद्रपूर |
| ६ | तिरोडा | गोंदिया | ३६ | चिखली | बुलढाणा | ६६ | कोरपना | चंद्रपूर |
| ७ | देऊळगाव राजा | बुलढाणा | ३७ | तळेगाव दाभाडे | पुणे | ६७ | अर्जुनी मोरगाव | गोंदिया |
| ८ | यवतमाळ | यवतमाळ | ३८ | उमरखेड | यवतमाळ | ६८ | इस्लामपूर | सांगली |
| ९ | आटपाडी | सांगली | ३९ | केज | बीड | ६९ | ब्रम्हपूरी | चंद्रपूर |
| १० | कळंब | धाराशिव | ४० | पाथर्डी | अहिल्यानगर | ७० | मोर्शी | अमरावती |
| ११ | उल्हासनगर | ठाणे | ४१ | सिरोंचा | गडचिरोली | ७१ | वसई | पालघर |
| १२ | अहेरी | गडचिरोली | ४२ | कडा | बीड | ७२ | भिवापूर | नागपूर |
| १३ | जामनेर | जळगाव | ४३ | तेल्हारा | अकोला | ७३ | बोदवड | जळगाव |
| १४ | पारोळा | जळगाव | ४४ | पारशिवनी | नागपूर | ७४ | सावली | चंद्रपूर |
| १५ | आंबेजोगाई | बीड | ४५ | गंगापूर | छ.संभाजीनगर | ७५ | मांढळ | नागपूर |
| १६ | औराद शहाजनी | लातूर | ४६ | अंजनगाव सुर्जी | अमरावती | ७६ | जळगाव जामोद | बुलढाणा |
| १७ | यावल | जळगाव | ४७ | करमाळा | सोलापूर | ७७ | धरणगाव | जळगाव |
| १८ | भोकरदन | जालना | ४८ | लोणंद | सातारा | ७८ | पेण | रायगड |
| १९ | श्रीगोंदा | अहिल्यानगर | ४९ | सांगोला | सोलापूर | ७९ | धाराशिव | धाराशिव |
| २० | कुर्डूवाडी | सोलापूर | ५० | पुसद | यवतमाळ | ८० | पैठण | छ.संभाजीनगर |
| २१ | सातारा | सातारा | ५१ | पवनी | भंडारा | ८१ | मंठा | जालना |
| २२ | रामटेक | नागपूर | ५२ | अंबड | जालना | ८२ | भंडारा | भंडारा |
| २३ | मुल | चंद्रपूर | ५३ | फलटण | सातारा | ८३ | समुद्रपूर | वर्धा |
| २४ | मेहेकर | बुलढाणा | ५४ | कर्जत | अहिल्यानगर | ८४ | देवरी | गोंदिया |
| २५ | काटोल | नागपूर | ५५ | अहमदपूर | लातूर | ८५ | सिंदेवाही | चंद्रपूर |
| २६ | शहादा | नंदूरबार | ५६ | आर्णी | यवतमाळ | ८६ | बुलढाणा | बुलढाणा |
| २७ | गेवराई | बीड | ५७ | गडचिरोली | गडचिरोली | ८७ | तुळजापूर | धाराशिव |
| २८ | दुधनी | सोलापूर | ५८ | राजुरा | चंद्रपूर | ८८ | बोरी | परभणी |
| २९ | बसमत | हिंगोली | ५९ | सडक अर्जुनी | गोंदिया | ८९ | जिंतूर | परभणी |
| ३० | गोरेगाव | गोंदिया | ६० | चिमूर | चंद्रपूर | ९० | नेरपरसोपंत | यवतमाळ |
| | | | | | | ९१ | बाभुळगाव | यवतमाळ |

**रु.५० लाख ते रु. १ कोटीपर्यंत उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- ब वर्ग (एकूण ५४)**

| अ. क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ. क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकोट | सोलापूर | २८ | फुलंब्री | छ.संभाजीनगर |
| २ | परतूर | जालना | २९ | पांढरकवडा | यवतमाळ |
| ३ | मंगळवेढा | सोलापूर | ३० | सोनपेठ | परभणी |
| ४ | मुरूम | धाराशिव | ३१ | मोहोळ | सोलापूर |
| ५ | रत्नागिरी | रत्नागिरी | ३२ | निरा | पुणे |
| ६ | पाथरी | परभणी | ३३ | कोरेगांव | सातारा |
| ७ | संग्रामपूर | बुलढाणा | ३४ | तळोदा | नंदुरबार |
| ८ | अलिबाग | रायगड | ३५ | चांदुर रेल्वे | अमरावती |
| ९ | गंगाखेड | परभणी | ३६ | पलूस | सांगली |
| १० | दिग्रस | यवतमाळ | ३७ | पुर्णा | परभणी |
| ११ | भोकर | नांदेड | ३८ | पाटण | सातारा |
| १२ | भुसावळ | जळगांव | ३९ | नरखेड | नागपूर |
| १३ | नवापूर | नंदुरबार | ४० | देगलूर | नांदेड |
| १४ | लाखांदुर | भंडारा | ४१ | कर्जत | रायगड |
| १५ | घनसावंगी | जालना | ४२ | हिंगणा | नागपूर |
| १६ | जवळाबाजार | हिंगोली | ४३ | पोंभुर्णा | चंद्रपुर |
| १७ | मालेगाव | वाशिम | ४४ | जाफ्राबाद | जालना |
| १८ | वणी | यवतमाळ | ४५ | दहिवडी | सातारा |
| १९ | साक्री | धुळे | ४६ | धारणी | अमरावती |
| २० | आष्टी | वर्धा | ४७ | महागाव | यवतमाळ |
| २१ | शहापूर | ठाणे | ४८ | बाळापूर | अकोला |
| २२ | नांदगाव (खं) | अमरावती | ४९ | वडवणी | बीड |
| २३ | लोहा | नांदेड | ५० | गडहिंग्लज | कोल्हापूर |
| २४ | उमरगा | धाराशिव | ५१ | बार्शी टाकळी | अकोला |
| २५ | अकोले | अहिल्यानगर | ५२ | उमरी | नांदेड |
| २६ | मारेगाव | यवतमाळ | ५३ | मौदा | नागपूर |
| २७ | मुरबाड | ठाणे | ५४ | सेनगाव | हिंगोली |

रु.२५ लाख ते रु.५० लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- क वर्ग (एकूण २७)

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामठी | नागपूर | १४ | ताडकळस | परभणी |
| २ | वडूज | सातारा | १५ | सिंधुदुर्ग | सिंधुदुर्ग |
| ३ | हदगाव | नांदेड | १६ | मुखेड | नांदेड |
| ४ | परांडा | धाराशिव | १७ | शिराळा | सांगली |
| ५ | निलंगा | लातूर | १८ | झरी झामणी | यवतमाळ |
| ६ | भद्रावती | चंद्रपूर | १९ | पालघर | पालघर |
| ७ | रेणापूर | लातूर | २० | हिमायतनगर | नांदेड |
| ८ | महाड | रायगड | २१ | सिंदखेडराजा | बुलढाणा |
| ९ | विटा | सांगली | २२ | माणगाव | रायगड |
| १० | पाटोदा | बीड | २३ | आखाडा बाळापूर | हिंगोली |
| ११ | किनवट | नांदेड | २४ | नायगांव | नांदेड |
| १२ | कळंब | यवतमाळ | २५ | अक्कलकुवा | नंदुरबार |
| १३ | चाकूर | लातूर | २६ | रोहा | रायगड |
| | | | २७ | कंधार | नांदेड |

रु.२५ लाखापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या बाजार समित्या- ड वर्ग (एकूण ३०)

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा | अ.क्र. | बाजार समितीचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पातूर | अकोला | १६ | देवणी | लातूर |
| २ | बिलोली | नांदेड | १७ | इस्लापूर | नांदेड |
| ३ | दारव्हा | यवतमाळ | १८ | बोरी अरब | यवतमाळ |
| ४ | जळकोट | लातूर | १९ | मोताळा | बुलढाणा |
| ५ | जावली | सातारा | २० | कुंडलवाडी | नांदेड |
| ६ | भूम | धाराशिव | २१ | मुदखेड | नांदेड |
| ७ | पालम | परभणी | २२ | तिवासा | अमरावती |
| ८ | बदनापूर | जालना | २३ | मुरुड | रायगड |
| ९ | खुलताबाद | छ.संभाजीनगर | २४ | वाशी | धाराशिव |
| १० | धडगाव | नंदुरबार | २५ | लोहारा | धाराशिव |
| ११ | सुरगाणा | नाशिक | २६ | डहाणु | पालघर |
| १२ | आष्टी | जालना | २७ | खालापूर | रायगड |
| १३ | माहुर | नांदेड | २८ | शिरुर अनंतपाळ | लातूर |
| १४ | भोर | पुणे | २९ | सिरसम | हिंगोली |
| १५ | कळमनुरी | हिंगोली | ३० | मुळशी | पुणे |

*************

मा. मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत प्रत्येक तालुका स्तरावर नवीन कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: कृबास २०२५/प्र.क्र.३१/११-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि.१७ एप्रिल, २०२५

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य असून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला विविध शेतमाल हा ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व कृषि मालाच्या वितरणाकरिता एकाच ठिकाणी सुविधा/सोय व्हावी तसेच याकामासाठी क्षेत्र निहाय स्वतंत्र यंत्रणा असावी या उद्देशाने सक्षम विपणन व्यवस्था म्हणून "कृषि उत्पन्न बाजार समिती" असणे आवश्यक आहे. अशी व्यवस्था नसल्यास शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल खाजगी व्यापाऱ्यास विक्री करणे तसेच शेतकऱ्यांना दूरच्या ठिकाणी शेतमाल विक्रीसाठी नेणे इत्यादी बाबींमुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन(विकास व विनियमन) अधिनियम १९६३मधील तरतुदी अंतर्गत सद्यस्थितीत राज्यात एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्या असुन सदर बाजार समित्यांचे ६२५ उपबाजार आवार कार्यरत आहेत. मात्र राज्यातील ६८ तालुक्यांमध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यरत नसल्याचे निर्दशनास आले आहे.

पणन विभागामार्फत पुढील १०० दिवसांत करावयाच्या कृती कार्यक्रमाचे मा.मुख्यमंत्री महोदयांसमोर केलेल्या सादरीकरणावेळी "राज्यात एकूण ३५८ तालुक्यांपैकी ६८ तालुक्यामध्ये बाजार समित्या अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन(विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील तरतूदीनुसार मा.मुख्यमंत्री बाजार समिती योजने अंतर्गत तालुका स्तरावर नवीन बाजार समित्या स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल." असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विधानमंडळाच्या २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनावेळी मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात "एक तालुका एक बाजार समिती योजना" ची घोषणा करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने , राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी ६८ तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नसल्याने प्रत्येक तालुक्यासाठी किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याकरिता "मुख्यमंत्री बाजार समिती योजना" राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन(विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम २(१) (अ) मध्ये "कृषि उत्पन्न" ची व्याख्या नमूद करण्यात आली आहे.सदर कृषि उत्पन्नाच्या व्याख्येमध्ये अधिनियमातील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले कृषी, फलोत्पादन, पशुधन, मधुमक्षिकापालन, मत्स्यसंवर्धन, मत्स्यव्यवसाय व वन यांचे सर्व उत्पन्न (मग ते प्रक्रिया केलेले असो अथवा नसो) अशी तरतूद आहे.

२. राज्यातील एकूण ६८ तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नसली तरी मुंबई उपनगर या जिल्ह्यातील तालुके (कुर्ला, अंधेरी, बोरिवली) मध्ये शहरी भाग असल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समित्या स्थापन करणे व्यावहारिकदृष्ट्या संयुक्तिक नाही. तसेच जालना कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजन होऊन बदनापूर कृषि उत्पन्न बाजार समितीची निर्मिती झाल्यामुळे सदर तालुके मुख्यमंत्री बाजार समिती योजनेतून वगळणे आवश्यक ठरेल. प्रसंगत: बदनापूर कृषि उत्पन्न बाजार समितीसंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल विविध न्यायप्रविष्ठ प्रकरणी मा. न्यायालयात होणाऱ्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन राज्यात एकूण ३५८ तालुक्यांपैकी ६८ तालुक्यामध्ये बाजार समित्या अस्तित्वात नसल्याने मुंबई उपनगर जिल्हयातील ३ तालुके वगळून उर्वरित ६५ तालुक्यांमध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन(विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील तरतूदीनुसार मा.मुख्यमंत्री बाजार समिती योजने अंतर्गत तालुका स्तरावर नवीन बाजार समित्या स्थापन करण्याचा तत्वत: निर्णय घेण्यात येत आहे. (६५ तालुक्यांची जिल्हानिहाय यादी खालीलप्रमाणे आहे.)

| अ.क्र | जिल्ह्याचे नाव | ज्या ६५ तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, अशा तालुक्याचे नाव | एकूण तालुके |
|---|---|---|---|
| १. | सिंधुदुर्ग | कणकवली, वैभववाडी, देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ले, दोडामार्ग | ०७ |
| २. | रत्नागिरी | संगमेश्वर, लांजा, राजापूर, चिपळूण, गुहागर, दापोली, मंडणगड, खेड | ०८ |
| ३. | रायगड | उरण, टाळा, सुधागड-पाली, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हासळा | ०६ |
| ४. | ठाणे | अंबरनाथ | ०१ |
| ५. | पालघर | तलासरी, जवाहर, मोखाडा, वाडा, विक्रमगड | ०५ |
| ६. | नाशिक | पेठ, त्र्यंबकेश्वर | ०२ |
| ७. | जळगाव | एरंडोल, मुक्ताईनगर, भडगाव | ०३ |
| ८. | अमरावती | भातकुली, चिखलदरा | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | पुणे | वेल्हा | ०१ |
| १०. | नागपूर | नागपूर ग्रामीण | ०१ |
| ११. | भंडारा | मोहाडी, साकोली | ०२ |
| १२. | गोंदिया | सालेकसा | ०१ |
| १३. | गडचिरोली | धानोरा, मुलचेरा, देसाईगंज, कुरखेडा, कोर्ची, एटापल्ली, भामरागड | ०७ |
| १४. | चंद्रपूर | बल्लारपूर, जिवती | ०२ |
| १५. | नांदेड | अर्धापूर | ०१ |
| १६. | छ.संभाजीनगर | खुलताबाद, सोयगांव | ०२ |
| १७. | बीड | शिरुर कासार | ०१ |
| १८. | सोलापूर | सोलापूर दक्षिण | ०१ |
| १९. | सातारा | महाबळेश्वर | ०१ |
| २०. | सांगली | कवठे महाकांळ, जत, कडेगाव | ०३ |
| २१. | कोल्हापूर | पन्हाळा, शाहुवाडी, कागल, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, चंदगड, आजरा | ०८ |
| | | **एकूण** | ६५ |

उपरोक्त ६५ तालुक्यांमध्ये खालील अटीस अधिन राहून प्रत्येक तालुक्याकरिता एक बाजार समिती निर्माण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१. प्रत्येक तालुक्यासाठी नव्याने स्थापन करावयाच्या कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ मधील कलम २(१)(अ) मध्ये “कृषी उत्पन्न” संदर्भातील व्याख्येत नमूद केलेल्या कृषी उत्पन्नाच्या आवक-जावक च्या प्रमाणात मुलभूत पायाभूत सुविधांसाठी आवश्यक क्षेत्राची निश्चिती करुन शासकीय जमिन नाममात्र दराने देणेबाबत संबंधित सहायक निबंधक सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी पणन संचालक यांच्या शिफारशीसह पणन विभागामार्फत महसूल विभागास प्रस्ताव सादर करावा.

२. प्रस्तावित बाजार समितीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा व तांत्रिक सुविधांबाबत स्थानिक गरजा विचारात घेऊन पणन संचालक यांनी निकष निश्चित करावेत.

३. प्रस्तावित बाजार समितीसाठी आवश्यकतेनुसार किमान मनुष्यबळाची संख्या निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कार्यप्रणालीचा अवलंब करुन आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यात यावे.

४. प्रस्तावित बाजार समितीसाठी कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियम) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीनुसार आडते व व्यापाऱ्यांचे परवाने तसेच अनुज्ञप्ती देण्यासंदर्भात विहित कार्यप्रणालीनुसार सक्षम प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५. रत्नागिरी, रायगड, सिंधदुर्ग या जिल्हयात नव्याने होणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समितीसाठी किमान ५ एकर जागा आवश्यक राहील. उर्वरित जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन करणेबाबत किमान १० ते १५ एकर जागेची आवश्यकता राहील.

६. प्रस्तावित बाजार समितीला आवश्यक जमिन खरेदी, पायाभुत सुविधा उभारणे, मनुष्यबळाची नेमणूक करुन त्यांना वेतन व इतर अनुषंगीक भत्ते अदा करणेबाबत तसेच अनुषंगिक बाबीं साठी निधी उभारणेबाबतची कार्यवाही प्रस्तावित कृषि उत्पन्न बाजार समितीने करावयाची आहे.

४. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, छ.संभाजीनगर यांच्या दि.१३.१०.२०२३ रोजीच्या आदेशान्वये कृषि उत्पन्न बाजार समिती, खुलताबाद याचे विलिनीकरण कृषि उत्पन्न बाजार समिती, लासूर स्टेशन मध्ये करण्यात आले आहे.मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायप्रविष्ठ न्यायालयीन प्रकरणी /रिट याचिकांमध्ये मा.न्यायालयाच्या होणाऱ्या निर्णयानुसार छ.संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद याठिकाणी बाजार समिती स्थापन करणेबाबत प्रकरण परत्वे निर्णय घेण्यात येईल.

५. मुख्य कृषि उत्पन्न बाजार समिती अस्तित्वात नसलेल्या ज्या तालुक्यांमध्ये उपबाजार कार्यरत आहेत अशा उपबाजारांचे मुख्य कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये रुपांतर करणेस प्राधान्य देऊन अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४१७१२५११०१६८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH DNYANDEO DESHMUKH

Digitally signed by SANTOSH DNYANDEO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=9652b1a97746d93924d97e059e2acb2aa9b6ef9c2644ab23e6c801f3e656b5ad, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=17757CD30ED5F82FA2A50F777CBE63490087D3EBC860660E708648C95D8488B7, cn=SANTOSH DNYANDEO DESHMUKH
Date: 2025.04.17 12:53:31 +05'30'

**( संतोष ज्ञा. देशमुख )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई-३२

२. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ, मुंबई-३२

३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे सहसचिव, मंत्रालय मुंबई

४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

६. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व जिल्हे)

७. अवर सचिव/कक्ष अधिकारी, कार्यासन २१-स, २४-स, १०-स,१-स सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

८. निवडनस्ती ११-स

**Government of Maharashtra**

**Department of Co-operation, Marketing and Textile,**

Madam Kama Road, Mantralaya Mumbai 400 032

No-APMC-0125/eNAM/C.R.82 /21-C

Dated - 25 /03/2025

To,

**Hon. Joint Secretary and AMA, GoI**
Ministry of Agriculture and Farmers Welfare,
Department of Agriculture, Cooperation and Farmers welfare,
**Room No.237,** Krishi Bhawan,
New Delhi, 110001

**Subject - Fund requirement for Integration of Additional 18 APMCs with eNAM of Maharashtra State...**

Sir,

At the outset I would like to thank you for sanctioning 133 APMCs to integrate with eNAM and release of funds for the same. Additional 18 APMCs have been identified and approved by State Level Sanctioning Committee in meeting held on 20th March, 2025 based on income, arrivals above 5000 MT per year, to integrate with eNAM.

The proposal with DPRs for Integration of these 18 APMCs of Maharashtra State with eNAM is enclosed herewith. You are requested to release the funds of Rs.5.40/- Crore to Maharashtra State Agricultural Marketing Board, Pune.

Thanking you.

Yours faithfully,

25/3/2025

(Pravin Darade)
Principal Secretary (Co-op &Marketing)

**Enclosed -**
1. Minutes of Meeting of State Level Sanctioning Committee (SLSC)
2. DPR Copy

**Copy for information –**
1. Hon. Chief Secretary, Maharashtra State
2. Additional Chief Secretary (Revenue) & Chairman of SLSC

**CC -**
1. Additional Chief Secretary (Finance)
2. Dy. AMA, DMI, Mumbai
3. Director of Marketing, Maharashtra
4. Managing Director, MSAMB, Pune